# ईएमआय ऑफर्स, शिल्लक हस्तांतरण आणि कार्डावरील कर्जासाठी अटी आणि शर्ती

1. रक्कम, व्याजदर, मुदत, प्रक्रिया शुल्क आणि खाते मुदतपूर्व बंद केल्यास लागू आकारणी तुम्हाला सुविधा निर्गमित करतेवेळी कळविण्यात येईल.
2. शिल्लक हस्तांतरण ऑफर किंवा क्रेडिट कार्डावरील कर्ज ईएमआय सुविधेसह येईलच असे नाही.
3. ह्या सुविधांसाठी एक स्वतंत्र कर्ज खाते उघडण्यात येईल. खाते क्रमांक तुमच्या कार्ड स्टेटमेंटवर दिसेल आणि तुम्ही तुमच्या प्रत्येक खात्यावरचे पैसे स्वतंत्ररीत्या भरावेत अशी विनंती आहे. जर तुम्ही विविध कार्ड खात्यांवरील थकित पैसे एकाच चेकने / डीडी ने भरत असाल तर तो तुमच्या कोणत्याही एका खाते क्रमांकाच्या नावे काढावा आणि भरलेल्या त्या पैशांची वर्गवारी कशी करावी ह्याच्या स्पष्ट सूचना चेकच्या / डीडीच्या मागे द्याव्यात.
4. स्पष्टपणे वेगळे नमूद केले नसल्यास तुमच्या क्रेडिट कार्डावर मान्य केलेले कोणतेही कर्ज तुमच्या क्रेडिट कार्ड मर्यादेचा एक भाग असेल. अशा वेळी तुमची क्रेडिट कार्ड मर्यादा, क्रेडिट कार्डावर घेतलेल्या कर्जाच्या थकित मुद्दलाइतकी रोखली जाईल. ज्यावेळी तुम्ही तुमचा मासिक ईएमआय/लागू रक्कम भराल त्यावेळी तुमच्या उपलब्ध पतमर्यादेत तुम्ही भरणा केलेल्या मुद्दलाच्या रकमेइतकी वाढ होईल.
5. तुमच्या मासिक स्टेटमेंटवर दर्शविलेल्या 'उपलब्ध पतमर्यादेमध्ये' शिल्लक हस्तांतरणापोटी, उचललेल्या अग्रिम रकमा आणि तुमच्या ईएमआय कर्ज खात्यांमधील न भरणा झालेल्या मुद्दल रकमांचा हिशेब प्रतिबिंबित झालेला असतो.
6. ईएमआय खात्यासाठी कृपया खाली दिलेली स्टेटमेंटची नमुना कॉपी पहा. त्यावरून तुम्हाला आमची ईएमआय खात्यांच्या बिलिंगची पद्धत समजण्यास मदत होईल.



7. दरमहा ईएमआय तुमच्या किमान देय रकमेमध्ये मिळवण्यात येईल आणि अधिदानाच्या नमूद देय दिनांकापर्यंत किमान देय रक्कम पूर्णतः न भरल्यास त्यावर दंडात्मक आकारणी लागू होईल. ईएमआय आणि किमान देय रक्कम तुमच्या क्रेडिट कार्ड मर्यादेचा एक भाग असेल. जर थकित रक्कम (ईएमआयसहित) पतमर्यादेपेक्षा जास्त झाली तर तुम्हाला मर्यादा उल्लंघनासाठी लागू आकारणी भरावी लागेल.

8. या खास प्रवर्तकीय ऑफर्स फक्त निवडक कार्डधारकांसाठी आहेत. हे कार्डधारक केवळ स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या (''बँक'') निर्णयाधीन राहून निवडले जातात. भविष्यात अशा ऑफर्स आणायच्या की नाही हे केवळ बँकेच्या निर्णयाधीन आहे.

9. कर्जाची रक्कम, लागू व्याज, प्रक्रिया शुल्क आणि सेवा कर (ईएमआयच्या व्याजघटकावर) तुमच्या मासिक कार्ड स्टेटमेंटमध्ये बिल करण्यात येईल.

10. ह्या योजनेमध्ये कोणत्याही वेळी भर घालण्याचा, बदल करण्याचा, फेरफार करण्याचा, दुरुस्ती करण्याचा, सुधारणा करण्याचा, काही किंवा सर्व अटी आणि शर्ती बदलण्याचा, ह्या योजनेऐवजी अंशतः किंवा पूर्णतः दुसरी एखादी योजना आणण्याचा, मग ती ह्या योजनेसारखी असो वा नसो, किंवा ही योजना पूर्णतः मागे घेण्याचा हक्क बँक राखून ठेवीत आहे.

11. आधीच्या पैशाचा भरणा थकित राहिल्यास किंवा कार्ड रद्द झाल्यास स्टँडर्ड चार्टर्ड बँक, हे कर्ज मुदतीपूर्व बंद करण्याचा आणि संपूर्ण थकित रक्कम येणे दाखवण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

12. ह्या योजनेमुळे उद्भवलेल्या कोणत्याही कृती, दावे, मागण्या, तोटे, खर्च, नुकसान, आकारणी सहभागींना सोसाव्या लागल्या तर सहभागी त्यासाठी बँकेला जबाबदार किंवा बाध्य समजणार नाहीत.

13. सर्व हप्ते आकारले जाण्यापूर्वी जर तुमचे स्टँडर्ड चार्टर्ड बँक क्रेडिट कार्ड बंद झाले किंवा तुमचे ईएमआय खाते मुदतीपूर्वी बंद झाले तर मुदतपूर्व बंद करण्याबद्दल आकारणीसहित थकित कर्ज रक्कम तुमच्या क्रेडिट कार्डावर एकरकमी आकारण्यात येईल. नंतर ही तुमच्या क्रेडिट कार्डावरील थकित रक्कम समजण्यात येईल आणि ती अंशतः / पूर्णतः न भरल्यास (क्रेडिट कार्डाच्या अटी व शर्तींप्रमाणे) तिच्यावर वित्तीय आकारणी लागू होईल.

14. येथे नमूद केलेल्या कशाहीमुळे कार्ड सदस्यत्व कराराच्या अटी व शर्तींवर परिणाम होणार नाही किंवा त्यांना बाधा येणार नाही. ह्या कराराच्या अटी बँकेच्या कार्ड सदस्यत्व नियम आणि नियमावलींव्यतिरिक्त असतील आणि त्यांना उणेपणा आणणार नाहीत.

15. जर तुम्हाला कर्जाचा तपशील, व्याजदर, लागू आकारणी, किंवा अटी आणि शर्ती मान्य नसतील तर तुम्ही बँकेच्या हेल्पलाईनला कॉल करून कर्ज 15 दिवसांच्या आत रद्द करणे आवश्यक आहे अन्यथा तुम्ही कर्ज आणि येथे दिलेल्या अटी व शर्ती स्वीकारल्याचे समजण्यात येईल आणि तुम्हाला डिमांड ड्राफ्टच्या दिनांकापासून वितरित रकमेवर व्याज भरावे लागेल.

16. त्यानंतर स्वेच्छेने रद्द करण्याचा विचार होणार नाही.

17. तुमचे ईएमआय खाते मुदतीपूर्वी रद्द करण्यासाठी कृपया हेल्पलाईन क्रमांकांना कॉल करा.